आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
०५ मे २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर चिनाब नदीवरल्या बागलिहार धरणातून पाकिस्तानला जाणारं पाणी अडवण्याचा केंद्रसरकारचा निर्णय, दहशतवादाविरुद्धच्या भारताच्या लढ्याला रशिया आणि जपानचा पाठिंबा

- वक्फ सुधारणा कायदा २०२५ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर, आता येत्या १५ तारखेला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

- महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या, इयत्ता बारावीच्या परीक्षेत ९१ पूर्णांक ८८ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण

**आणि**

- खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत तिरंदाजीमधे महाराष्ट्राच्या खेळाडूंची सुवर्णपदकाकडे वाटचाल

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर चिनाब नदीवरल्या बागलिहार धरणातून पाकिस्तानला जाणारं पाणी अडवण्याचा निर्णय भारतानं घेतला आहे. तसंच झेलम नदीवरल्या किशनगंगा धरणाचं पाणी रोखण्याचा विचारही भारत करत असल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहरानं कळवलं आहे. २२ एप्रिलला पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी  हल्ल्यात २६ नागरिक मृत्युमुखी पडले होते, त्यानंतर भारतानं पाकिस्तानसोबतचा पाणी वाटपाचा  सिंधु करार रद्द करण्याचा निर्णय घेतला होता.  हा करार १९६० मधे करण्यात आला होता. बागलिहार धरणाबाबत भारत आणि पाकिस्तानमधे गेल्या अनेक वर्षापासून वाद आहे.

**<><><><><>**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरुन संवाद साधत, पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला. भारताच्या दहशतवाद विरोधी लढ्याला रशियाचा संपूर्ण पाठिंबा असल्याचं त्यांनी सांगितलं. यावेळ दोन्ही नेत्यांनी भारत आणि रशिया यांच्यातली विशेष धोरणात्मक भागीदारी अधिक मजबूत करण्यासाठीची बांधिलकी व्यक्त केल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी समाजमाध्यमावर सांगितलं आहे.

<><><><>

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि जपानचे संरक्षण मंत्री जनरल नाकातानी यांच्यात नवी दिल्ली इथं आज द्विपक्षीय बैठक झाली. या बैठकीत जनरल नाकातानी यांनी पहलगाम हल्ल्याचा निषेध केला, तसंच भारताला पूर्ण पाठिंबा व्यक्त केला. भारत आणि जपानच्या संरक्षण आणि सुरक्षा यंत्रणांचा आढावाही दोन्ही नेत्यांनी या बैठकीत घेतला. दोन्ही देशांमधले द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्याबाबबत दोन्ही नेत्यांंमधे सहमती झाली. भारत आणि जपान यांच्यातल्या वाढत्या संरक्षण सरावावर दोघांनीही समाधान व्यक्त केलं. तसंच सागरी क्षेत्रातल्या सहकार्यावर भर दिला.

बैठकीआधी नाकातानी यांना तिन्ही सेवा दलांकडून गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. तसंच त्यांनी राष्ट्रीय युद्ध स्मारकाला भेट देऊन शहीद जवानांना आदरांजली वाहिली.

<><><><>

परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज जपानच्या प्रतिनिधी सभेचे अध्यक्ष फुकुशिरो नुकागा यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यासमवेत काही खासदार आणि व्यापारी प्रतिनिधी देखील होते. यावेळी भारत आणि जपान यांच्यात बौद्धिक प्रतिभेचे आदानप्रदान, व्यापार संबंध आणि तंत्रज्ञानविषयक भागीदारी वाढवण्यावर सहमती झाली.

**<><><><><>**

वक्फ सुधारणा कायदा २०२५ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर, आता येत्या १५ तारखेला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्यासह न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी होणार होती. मात्र आपण लौकरच सेवानिवृत्त होणार असल्यानं ही सुनावणी भावी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या पीठासमोर होईल, असं सांगून न्यायमूर्ती खन्ना यांनी पुढची तारीख दिली.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. परीक्षेचा एकूण निकाल ९१ पूर्णांक ८८ शतांश टक्के इतका लागला आहे. याबाबतचा वृत्तांत ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून..

**होल्ड - व्हॉईस कास्ट- भक्ती (१.२४)**

*(राज्यात ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत बारावीची परीक्षा घेण्यात आली. एकूण १४ लाख १७ हजार ९६९ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण या ९ विभागीय मंडळात ही परीक्षा घेण्यात आली.*

*कोकण विभागाचा निकाल ९६ पूर्णांक ७४ शतांश टक्के लागला असून हा विभाग पुन्हा एकदा अव्वल स्थानी आला आहे. त्यापाठोपाठ मुंबई विभागाचा निकाल ९२ पूर्णांक ९३ शतांश टक्के लागला आहे, पुणे- ९१ पूर्णांक ३२ शतांश टक्के, नागपूर- ९० पूर्णांक ५२ शतांश टक्के, छत्रपती संभाजीनगर- ९२ पूर्णांक २४ शतांश टक्के, कोल्हापूर- ९३ पूर्णांक ६४ शतांश टक्के, अमरावती- ९१ पूर्णांक ४३*

*शतांश टक्के, नाशिक- ९१ पूर्णांक ३१ शतांश टक्के, तर लातूर विभागाचा निकाल सर्वात कमी, ८९ पूर्णांक ४६ शतांश टक्के इतका लागला आहे.*

*विज्ञान शाखेचा निकाल ९७ पूर्णांक ३५ शतांश टक्के, कला शाखेचा ८० पूर्णांक ५२ शतांश टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ९२ पूर्णांक ६८ शतांश टक्के इतका लागला आहे. विद्यार्थ्यांना उद्यापासून महाविद्यालयात गुणपत्रिका मिळतील.)*

**<><><><><>**

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी तिरंदाजी प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी वर्चस्व गाजवलं. महिला गटात वैष्णवी पवार  आणि शर्वरी शिंदे यांच्यात सुवर्ण पदकासाठी सामना होणार आहे. तर पुरुष गटात महाराष्ट्राचा उज्ज्वल ओळेकर आणि तामिळनाडूचा एल आर सर्वेश यांच्यात सामना होणार आहे.

कम्पाऊंड स्पर्धेत पुरुष गटात महाराष्ट्राचा मानव गणेश जाधव आणि झारखंडचा देवांश सिंह यांच्यात सुवर्ण पदकासाठी लढत होईल. तर महिला गटात महाराष्ट्राच्यात तेजल साळवे आणि प्रथिका या सुवर्णपदाकाच्या दावेदार आहेत.

नेमबाजीमधे एअर रायफल प्रकारात राजस्थानच्या संघानं सुवर्ण पदकावर नाव कोरलं. राजस्थानच्या मयांक चौधरी आणि प्राची यांनी सामन्यात सुरुवातीपासूनच आघाडी घेतली. तर उत्तर प्रदेशच्या देव प्रताप आणि उर्वा चौधरी यांनी १५-१५ अशी बरोबरी साधण्यात यश मिळवलं.

गटका या क्रीडा प्रकारात महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि चंदीगड या राज्यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांना नमवत विजय मिळवला. तर  गोव्याला बिहारकडून आणि तेलंगणाला आसामकडून पराभव पत्करावा लागला. पंजाब, झारखंड आणि तामिळनाडू या राज्यांनीही आपल्या प्रतिस्पर्धी संघांना पराभूत करत स्पर्धेत मुसंडी मारली.

महिलांच्या फूटबॉल सामन्यात तामिळनाडूने बिहारचा २-१ असा पराभव केला. बेगुसरायमधल्या रिफायनरी मैदानावर आज हा सामना झाला. खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत आज कब्बडी, धनुर्विद्या या क्रीडा प्रकारांचेही सामने झाले.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज हैदराबाद इथं सनरायझर्स हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना सुरु आहे. सनरायझर्स हैदराबादनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा दिल्ली कॅपिटल्सच्या ८ व्या  षटकात ५ बाद २९ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

हरियाणाला त्यांच्या वाट्यापेक्षा एक थेंबही जास्त पाणी देणार नाही असा निर्णय पंजाब सरकारने घेतला आहे. पंजाब विधानसभेच्या आजच्या विशेष अधिवेशनात हा निर्णय झाला. सध्या पंजाबने चार हजार क्युसेक्स पाणी हरियाणाला सोड़लं आहे, ते सुरू राहील असं पंजाब सरकारने सांगितलं आहे.

**<><><><><>**

पाकिस्तानी सायबर गुन्हेगारांनी भारतीय लष्कराच्या वेबसाइटला लक्ष्य केल्याची माहिती लष्करी सूत्रांनी दिली आहे. पाकिस्तानी हॅकर्सनी भारताच्या लष्करी अभियांत्रिकी सेवा आणि मनोहर पर्रीकर संरक्षण अध्ययन  आणि विश्लेषण संस्थेमधली संवेदनशील माहिती कथितरित्या चोरली असं सूत्रांनी सांगितलं. या हल्लेखोरांनी संरक्षण क्षेत्रातल्या अधिकाऱ्यांचा वैयक्तिक तपशील आणि त्यांचे वेबसाईट लॉग इनचे तपशील हॅक केले असावेत असा अंदाज आहे.

**<><><><><>**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज ५८व्या एडीबी वार्षिक बैठकीत आशियाई विकास बँकेचे अध्यक्ष मसातो कांडा यांची भेट घेतली. इटलीत मिलान

इथे झालेल्या या बैठकीत अर्थमंत्र्यांनी सांगितलं की, भारत खासगी क्षेत्राच्या नेतृत्वाखालील आर्थिक विकासावर लक्ष केंद्रीत करत असून व्यापाराच्या सुलभीकरणासाठी सातत्याने अनुकूल धोरण राबवून नियामक परिसंस्था विकसित करत आहे. या उपक्रमांमध्ये कॉर्पोरेट दर कपात, जीएसटी अंमलबजावणी, स्टार्टअप इंडिया यांचा समावेश होतो, असंही त्या म्हणाल्या.

**//<><><><><>//**